# प्रेस नोट

## सायबर गुन्हे शाखा, मुंबई यांची मोठी कारवाई बनावट APK फाईलद्वारे मोबाईल हॅक करून ऑनलाईन आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

----------------------------------------------------------------------------------------------------------

**गुन्ह्याची थोडक्यात माहिती**... तक्रारदार यांना महानगर गॅस लिमिटेडच्या नावाने बनावट संदेश पाठवून “MGL GAS UNBLOCK FILE.apk” ही बनावट APK फाईल इन्स्टॉल करण्यास भाग पाडण्यात आले सदर APK द्वारे मोबाईलमधील बँक माहिती मिळवून रुपये २,३५,०००/- आर्थिक फसवणूक करण्यात आली. त्यावरून सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, मुंबई येथे गु.र. क्र. ८१/२०२६ कलम ३१८(४), ३१९(२), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३(५) भा.न्या.सं. सह ४३,६६, ६६ क, ६६ ड माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तांत्रिक तपासाद्वारे आरोपींचा शोध घेऊन, बनावट ए.पी.के डेव्हलपर, त्या ए.पी.के वितरीत करणारे तसेच पिडीतांना ए.पी.के पाठवुन फसवुणक करणारे असे एकुण ६ आरोपी झारखंड, बिहार व दिल्ली येथून खालील आरोपींना अटक करण्यात आली.

**अटक आरोपींची नावे**.

१. आरिफ अस्तुन अन्सारी, वय २८ वर्षे, रा. ठी बांकीकला, पोस्ट परवतपूर, पोलीस स्टेशन अहिल्यापूर, जिल्हा गिरिडीह, झारखंड.
2. शेख बेलाल नौशाद, वय २८ वर्षे, रा.ठी महजोरी, पोस्ट मंडरो, पोलीस स्टेशन गांडेय, जिल्हा गिरिडीह, झारखंड.

३. मेहबूब नौशाद आलम, वय २६ वर्षे, रा. ठी बांकीकला, पोस्ट परवतपूर, पोलीस स्टेशन अहिल्यापूर, जिल्हा गिरिडीह, झारखंड.
४. साजिद मन्सूर अली, वय २९ वर्षे, रा.ठी कपाशेरा, साउथ वेस्ट, नवी दिल्ली.
५. मोहन कुशल महतो, वय २३ वर्षे, रा.ठी, करमतांड, पोस्ट चरक, पोलीस स्टेशन मनियाडीह, जिल्हा धनबाद, झारखंड,
६. सुनील कुमार दशरथ सोरेन, वय २५ वर्षे, रा.ठी करमतांड, पोस्ट चरक, पोलीस स्टेशन मनियाडीह, जिल्हा धनबाद, झारखंड.

**जप्त मुद्देमाल व डिजिटल पुरावे.**

1. आरोपींकडून एकूण **11 मोबाईल फोन , १ लॅपटॉप** असे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसेस जप्त करण्यात आले आहेत.

2. विविध बॅकेच्या RTO, महानगर गॅस, नावाच्या **एकुण १११** बनावट ए.पी.के फाईल्स मिळुन आल्या आहेत, तसेच डाटाबेस मध्ये **एकुण ८३** ए.पी.के शी संबधीत पॅकेज नेम मिळुन आले आहेत.

3. WhatsApp Groups, Telegram Groups, Telegram Bot व APK विक्रीबाबत संभाषण

4. Server Panel Login Credentials व URLs.

5. APK इंन्स्टॉल केल्यावर पिडीतांचे मोबाईल हॅक होउन, पिर्डीताचे मेसेज हे सायबर क्रिमीनल जात होते तरी अशाप्रकारचे Google Firebase व Hostinger Server मधून सुमारे **1.24 कोटी SMS records** मिळुन आले आहेत. तसेच वरील डाटाबेस मधुन बनावट एपीके फाईल्स इन्स्टॉल करणा-या पिर्डीतांचे एकुण **8609 मोबाईल क्रमांक, तसेच पिडीता संबधी संकलित केलली गोपनिय माहिती जसे कि, बॅक खाते क्रमांक, ए.टी.एम क्रमांक, पिन नंबर, सी.व्ही.व्ही नंबर, यु.पी. आय.डी** मिळुन आले आहेत.

6. गुन्हयातील रिकव्हर करण्यात आलेल्या डाटा व एन.सी.सी.आर पोर्टलवरील तक्रारीचे विश्लेषण केले असता, **भारतातील एकुण ३२०६ तक्रारी, फसवणुक झालेली एकुण रक्कम रूपये ४३,२५,७७,४९७/- (एकुण तक्रारी महाराष्ट्र ५१७, मुंबई ९३)** मध्ये नमुद टोळीचा सहभाग हा असल्याचे प्रथमदर्शी दिसुन आल्याने, गुन्हयातील आरोपीचा ताबा घेण्याकरीता सबंधित राज्य पोलीसांना व I4C ला माहिती देण्यात आली आहे.

**सायबर सुरक्षा सूचना.**

1.अनोळखी मोबाईल/व्हाटसअप नंबर वरुन आलेली APK फाईल इन्स्टॉल करू नये, तसेच अनोळखी मोबाईल/व्हाटसअप नंबर वरुन आलेली ZIP फाईल्स Extract करू नये.

2-OTP, ATM PIN व बँक माहिती कोणालाही देऊ नये.

3-फसवणूक झाल्यास 1930 हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त, बजरंग बनसोडे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त इरफान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. सुवर्णा शिंदे स.पो.नि नितीन गच्चे, स. पो.नि धनवेश पाटील, स.पो.नि विजय घोरपडे, पोउनि दिपक तायडे, स.पोउनि राजेश खुशलाणी, पो.ह सचिन सांवत, पो.ह प्रशांत भुवड, पो.ह महेंद्र तावडे, पो.शि. विकास दिगे, पो.शि संग्राम जाधव, पो.शि सुयेश लोकरे, पो.शि अमोल फापळे, पो.शि मयुर इंगळे, पो.शि ओमकार शिंदे, पो.शि अनिल वारे यांनी पार पाडली आहे.